प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सिडकोतर्फे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्या हस्ते करण्यात आले वृक्षारोपण

सिडकोतर्फे बुधवार, दि. ०५ जून २०२५ रोजी जागतिक पर्यारवण दिनानिमित्त सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील रायगड भवन समोरील मैदानावर वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी **श्री. विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको** यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत करंजा वृक्षाच्या रोपांची लागवड करण्यात आली.

**"सिडकोने नवी मुंबईत विविध प्रकल्प साकारत असताना पर्यावरणाचा नेहमीच समतोल राखला आहे. नवी मुंबई वसवताना सिडकोने शाश्वत विकासावर भर दिला आहे. यापुढेदेखील एका निरोगी व उज्जवल भविष्यासाठी पर्यावरणाचा समतोल राखून विकासकामे करण्यास सिडको कटिबद्ध आहे."**

**श्री. विजय सिंघल**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

या प्रसंगी **डॉ. राजा दयानिधी, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको, श्रीमती शीला करुणाकरन, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ), सिडको, श्री. दीपक हरताळकर, मुख्य अभियंता (नवी मुंबई), सिडको, श्रीमती गीता सावंत, उद्यान अधिकारी, सिडको** यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पर्यावरण रक्षणाकरिता जागरूकता निर्माण करणे आणि त्याबाबतच्या कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात येतो. या निमित्त पर्यावरणविषयक जागरूकता निर्माण करण्याऱ्या कृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -